महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
# भूमि अभिलेख विभाग

दिनांक - २५/११/२०२२ HELPLINE NUMBER- ०२०- २५७१२७१२

## सरळसेवा भरती २०२१

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक) संवर्गाकरीता सुरू असणाऱ्या पदभरती प्रक्रियेच्या अनुषंगाने दिनांक १५/११/२०२२ रोजी परीक्षेकामी पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक २५/११/२०२२ रोजी पात्र उमेदवारांची पुरवणी यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

उमेदवारांना जरी परीक्षेकरीता पात्र ठरविले असले तरी परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना त्यांचे मुळ कागदपत्रांची सक्षम प्राधिकाऱ्यांकडून पडताळणी केल्यानंतर त्या अभिप्रायांनुसार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून अंतिम नियुक्तीबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

तसेच प्रस्तुत पदभरतीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ९६७७/२०२१ प्रलंबित असून सदर याचिकेच्या अंतिम निर्णयास अधीन राहून पात्र उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार असून मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

स्वा./-XXX
(एन. के. सुधांशु) भा.प्र.से.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य), पुणे